# निविदा सूचना

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथ)

ई-निविदा सूचना क्र.3 /2024-25

शिक्षण विभाग(प्राथ) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग (दुरध्वनी क्रमांक 02362-228774,228770 याजकडून खालील कामांसाठी खालील शर्तीना अनुसरून महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागने विहित केलेल्या प्राधिकरणानी दिलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणी केलेल्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन एक्केवारी दराच्या निविदा मागविणेत येत आहेत निविदा फॉर्ममध्ये Performance Secutiry ची अट नमुद असून त्याची पुर्तता न झाल्यास सदर अट नमूद असून निविदा लखोटा क 02 उघडलेचा मेल मेसेज प्राप्त झालेपासून आठ दिवसांचे आत Performance Secutiry चा धनादेश कार्यालयात जमा करणेचा आहे. विहित मुदतित धनादेश प्राप्त न झालेस आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेत येईल. याकामी पत्रव्यवहार केला जाणार नाही. नोंदणीधारक वर्ग 5 अ यांनी रक्कम रूपये 5.00 लक्ष पर्यंतची कामे पूर्ण केलेली आहेत. अशा कामांचे काम पूर्णत्वाचा संबंधित विभागाचा दाखला लखोटा क्र 01 मध्ये सादर करणेचा आहे. तसेच नौदणीधारक वर्ग 5 सुबेअ यांनी रक्कम रुपये 15.00 लक्ष पर्यतची कामे पूर्ण केलेली आहेत. अशा कामांचे काम पूर्णत्वाचा संबंधित विभागाचा दाखला लखोटा क्र 01 मध्ये सादर करणेचा आहे आवश्यक रक्कमेची कामे पूर्णत्वाचा दाखला सादर न केलेस त्यांची निविदा उघडली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | टेंडर रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | नोंदणीचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जि. प. पूर्ण प्राथमिक शाळा तुळसुली तर्फ माणगाव येथे नवीन वर्गखोली बांधणे. ता. कुडाळ | 1199997/- | 954623/- | 10000/- | 500/- | वर्ग 5 सुबेअ |
| 2 | जि.प.केंद्र शाळा हेत इमारत दुरुस्ती करणे. ता. वैभववाडी | 2000000/- | 1639952/- | 17000/- | 1000/- | वर्ग 5 सुबेअ |
| 3 | तेर्सेबांबर्डे जि.प.प्राथमिक शाळा धुमकवाडी शाळा दुरुस्त करणे. ता.कुडाळ | 1198870/- | 994146/- | 10000/- | 500/- | मसस वर्ग ब व त्यावरील |

1.सपूर्ण निविदा प्रक्रिया online पध्दतीने राबविण्यात येईल निविदेसंबंधी सर्व सुचना http://mahatenders.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेत येतील

2.निविदेकरीता आवश्यक सर्व कागदपत्रांची माहिती वरील संकेत स्थळावर उपलब्ध असेल व सर्व संबंधीतांनी याच संकेतस्थळावर निविदा भराव्यात.

3.निविदा सुपूर्द करताना खालील गोष्टींचा अंतर्भाव असणे अनिवार्य राहील.निविदा फॉर्म फी व इसारा फी (EMD) (बयाणा रक्कम)ही वर नमुद संकेत स्थळावर दर्शविलेनुसार NET BANKING द्वारे संबंधित मक्तेदार यांनी स्वतःचे बँक खातेतुन भरणा करणेची आहे.निविदा फी व इसारा रक्कम NET BANKING द्वारे रक्कमा भरणा केलेबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र युनिक ट्रान्झॅक्शन रजिस्ट्रेशन (UTR) पावती क्रमांक तांत्रिक लिफाफा यासोबत अपलोड करणेचा आहे.बँक पासबुक खाती ज्या ठिकाणी सदर व्यवहाराची नोंद झाली आहे, त्या पृष्ठाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.याकरीता संबंधीत मक्तेदार यांनी आपले बँक खाते संबंधीत बँकेचे शाखेकडून आवश्यक ती कार्यवाही करुन घेणेची आहे

4. वरील सादरीकरणाची पुर्तता न केल्यास संबंधीत Bid अपात्र ठरविणेत येईल.

5. मक्तेदाराने सादर केलेले दर हे निविदा उघडल्याच्या दिनांकापासून 120 दिवसांपर्यन्त बंधनकारक रहातील.

6 कोणतीही एक सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवलेली आहे.

7. मक्तेदार यांनी दर हे BOQ फॉर्म मध्ये ऑनलाईन सादर करावयाचे आहेत.

8. मक्तेदार यांचे ग्रामविकास व जलसंधारण विभाग अंतर्गत जिल्हा परिषद नोंदणीप्रमाणपत्र अनिवार्य आहे.

9. निविदा नामंजूर झाल्यास त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

10.निविदा मंजूर झाल्याचे कळविलेवर करारपत्र व इतर कागदपत्र ठरवून दिलेल्या मुदतीत पूर्ण न केल्यास बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

11.प्रसिध्द केलेले कोणतेही काम निविदा सूचीतून वगळणेत येईल. तसे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेत येईल. त्याबाबत कोणाही व्यक्तीस अगर संस्थेस खुलासा मागता येणार नाही.

12.निविदा मजकुरात, रक्कमेत वा अन्य कोणत्याही बाबीत बदल झाल्यास तसे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेत येईल. त्याकरीता निविदा भरावयाच्या अंतिम वेळेपर्यन्त तशी शहानिशा संबंधीतांनी करावयाची आहे.

13. उपरोक्त मजकूरात अथवा रक्कमेत बदल संभवू शकतो.ऑनलाईन प्रसिध्दी मजकूर तसेच रक्कम अंतिम राहील.

14. निविदा फॉर्ममध्ये Performance Secutiry ची अट नमुद असून त्याची पुर्तता न झालेस सदर अटी मधील मुददा क्रमांक 06 नुसार कारवाई करणेत येईल.

15. शासन निर्णय दि. 05.04.2023 अन्वये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी 50 लक्ष पर्यंतचे नोंदणीकरण केलेले असल्यास विहित नमुण्यातील बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16. वर्ग 5 ब त्यावरील कामांसाठी सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना निविदा भरता येणार नाही.

(डॉ. गणपती कमळकर)

शिक्षण विभाग(प्राथमिक)

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner